गुरुविन न मिळे ज्ञान- डॉ. बी. एन. कांबळे

"गुरुविन न मिळे ज्ञान, ज्ञानाविन न जगी सन्मान या उक्तीनुसार प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुचे असणारे स्थान व महत्त्व अधोरेखित करत व्यंकटेश महाविद्यालयाचे उप-प्राचार्य तथा कॉमर्स विभाग प्रमुख डॉ. बी. एन. कांबळे यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी हितगुज साधले. व्यंकटेश महाविद्यालयातील बी.बी.ए. विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. त्यांनी आपल्या उपदेशपर मनोगतामध्ये गुरुचे जीवनातील महात्म्य काय असते, जीवनाला योग्य दिशा देण्याचे काम आणि दगडातून सुंदर मूर्ती घडवण्याचे काम गुरु करत असतात असे ते म्हणाले. जगातील सर्वात पहिले गुरू म्हणजे आपले आई-वडील असतात आणि आई-वडिलांसमान असणारे शिक्षक हे दुसरे गुरू असतात, जगायचं कसं याबाबत आपल्याला ते मार्गदर्शन करत असतात. गुरुंना वंदन करण्याचा आजचा दिवस प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या गुरूंच्या प्रती कृतज्ञ असावे ज्यांनी आपणाला घडवले त्यांना आकाशाला गवसणी घातल्यानंतर देखील कधीच विसरू नये असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी बी.बी.ए. विभाग प्रमुख सहाय्यक प्राध्यापिका पी. पी. दाइंगडे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. कार्यक्रमासाठी बी.बी.ए. विभागातील इतर प्राध्यापक उपस्थित होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनुक्रमे कुमारी भूमिका ग्रंथाडे कुमारी स्नेहा जाधव यांनी के